**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २३-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६७ | श्री. जिवाप्पा केरुबा खिलारी रा. सावली निवास, सूत गिरणीजवळ, मु.पो. देगांव, ता.जि.सातारा | कामगार अधिकारी, कामगार आयुक्त यांचे कार्यालय कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई-३४. | अपिलीय प्राधिकारी, कामगार आयुक्त यांचे कार्यालय कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई-३४. | दुकान निरीक्षक श्रेणी-२ यांची माहे एप्रिल-मे, ०८ मध्ये होणाऱ्या बदली पात्र कर्मचाऱ्यांची यादी, बदली आदेशाच्या प्रती, तसेच कर्मचाऱ्यांच्या विनंती बदली अर्जाच्या झेरॉक्स प्रती. इ. व श्री. जे. के. खिलारी, दु.नि. यांच्या निवेदनास अनुसरुन शासन पत्र व्यवहाराच्या प्रती | माहिती मिळाल्याचे व त्याबाबत पूर्ण समाधान झाल्याचे अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २३.१०.२००८ च्या फॅक्स द्वारे कळविले आहे. |
| २ | ४५६ | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जिल्हा सातारा | उप अभियंता, फलटण नगर परिषद ता.फलटण, जि.सातारा. | मुख्याधिकारी, फलटण नगर परिषद, फलटण, जि. सातारा | अनधिकृत बांधकामाबाबत माहिती | हवी ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने त्यांच्या दिनांक २३.१०.०८ च्या पत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४०२ | श्री. चंद्रकांत विठोबा जगताप विरंगुळा, लक्ष्मीनगर, फलटण शहर, ता. फलटण, जि.सातारा | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., फलटण शहर उप विभाग, ता. फलटण, जि. सातारा | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, फलटण शहर, ता.फलटण, जि. सातारा | वीज बिलांबाबत, तसेच वीज जोडणी बंद केल्याबाबत माहिती. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ४ | ४०३ | श्री. चंद्रकांत विठोबा जगताप विरंगुळा, लक्ष्मीनगर, फलटण शहर, ता. फलटण, जि.सातारा | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., फलटण शहर उप विभाग, ता.फलटण, जि.सातारा | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, फलटण शहर, ता.फलटण, जि.सातारा | सोमथळी येथील जाधव डीपीच्या बॉक्स बाबत व इतर बाबींबाबत. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ५ | ४१४ | श्री. चंद्रकांत विठोबा जगताप विरंगुळा, लक्ष्मीनगर, फलटण शहर, ता. फलटण, जि.सातारा | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., फलटण शहर उप विभाग, ता.फलटण, | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, फलटण शहर, ता.फलटण, | मुदतीत वीज बिले न मिळणे व उशिरा मिळालेल्या देयकाबाबत केलेली कार्यवाही व इतर | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | ४२४ | श्री. चंद्रकांत विठोबा जगताप विरंगुळा, लक्ष्मीनगर, | उप कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा | अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, | सिंचन विषयक, फुट ब्लॉकच्या पाणी पट्टीची आकारणी, | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | फलटण शहर, ता. फलटण, जि.सातारा | विभाग, फलटण, ता. फलटण, जि.सातारा | सिंचन भवन, पुणे-१. | पाणी पट्टीची रक्कम इ. १३ मुद्दे | |
| ७ | ४४३ | सर्वश्री. महेश चंद्रकांत जगताप व धनंजय चंद्रकांत जगताप विरंगुळा, लक्ष्मीनगर, फलटण शहर, ता. फलटण, जि.सातारा | उप कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण, ता. फलटण, जि.सातारा | अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे-१. | विहिरीवरील पिकांच्या पंचनाम्यासंबंधी माहिती, आकारणी रक्कम व वसुली रक्कमबाबत तसेच माहितीतील तफावतबाबत. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि.२३-१०-२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा, असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले (क्र.४६७, ४५६, ४०२, ४०३, ४१४, ४२४ व ४४३/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१-१०-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. दत्तात्रय शंकर बोरगांवकर
१२१६, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज पथ,
पुणे - ४११ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
रजिस्ट्रार, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,
ब्राम्हण पुरी, मिरज, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
रजिस्ट्रार, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,
ब्राम्हण पुरी, मिरज, जि. सांगली — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय शंकर बोरगावकर
१२१६, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज पथ, पुणे - ४११ ००४

**जन माहिती अधिकारी** तथा रजिस्ट्रार,
अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,
ब्राम्हण पुरी, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.५.२००६ |

**७ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

विशारद पूर्व नोव्हेंबर २००५ (बासरी) गुणदान केलेल्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती मिळणेबाबत

महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळाकडून गांधर्व महाविद्यालय मंडळाला अनुदान मिळते, त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण ठरून ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येते, असे प्रतिपादन श्री. बोरगांवकर यांनी केले. मिळणारे अनुदान अत्यल्प असून 'कलाविहार' मासिकाच्या प्रकाशनापुरताच त्याचा संबंध आहे. संस्थेच्या एकूण खर्चात त्याचे प्रमाण अत्यल्प (एक टक्काही नाही) आहे, असे प्रतिपादन संस्थेचे वकील श्री. आर.जी.कुलकर्णी यांनी केले. श्री. बोरगांवकर यांची तडजोडीबाबतची अट लक्षात घेता वैयक्तिक वादाचा हा विषय असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही संबंध नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. संस्थेला मिळणारे अनुदान भरीव मानता येत नसले तरी संस्था सार्वजनिक स्वरूपाची असून कारभारातील पारदर्शकतेचा भाग म्हणून अपीलकर्ता श्री. दत्तात्रय शंकर बोरगांवकर यांना उत्तरपत्रिकांचे अवलोकन करू द्यावे. उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती न देण्याचा संस्थेचा निर्णय योग्य आहे.

**पुणे**

**दि.** १८.१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मदन सखाराम कुलकर्णी<br>४५/१, दत्तनगर, जुळे सोलापूर,<br>कुमठेकर हॉस्पिटल मागे, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक वन सरंक्षक,<br>सोलापूर वनविभाग, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप वन सरंक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. मदन सखाराम कुलकर्णी यांनी घरबांधणीच्या कर्जाच्या वेतनातून वसूल झालेल्या हप्त्यांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन सरंक्षक, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चेत माहिती प्राप्त झाली असल्याने तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने आयोगास लेखी कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १९ .९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन कृष्णाजी जोशी
सोहम, शंकर तत्वज्ञान मंदिराजवळ,
मुलींच्या शाळेच्या मागे, ब्राम्हणपुरी,
मिरज, ता. मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, जत
जि. सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, जत
जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५ + ३० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गजानन कृष्णाजी जोशी
सोहम, शंकर तत्वज्ञान मंदिराजवळ,
मुलींच्या शाळेच्या मागे, ब्राम्हणपुरी,
मिरज, ता. मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जत
जि. सांगली श्री. दत्तात्रय शंकर गावसाने

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी, जत
जि. सांगली श्री. अशोक ईरप्पा मालगार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१०.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.२.२००६ |

८. **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मंजूर सेवानिवृत्त उपदान, माहे जानेवारी व फेब्रुवारी २००३ चे वेतन, रजा रोखी करणाचा महागाई फरक इ. देय रक्कम कोणत्या शासकीय आदेशान्वये रोखून धरण्यात आल्या, त्या आदेशाची प्रत, कै. एम.जी. कदम मंडल कृषि अधिकारी, जत यांना १ फेब्रुवारी १९९९ ते ३१ मार्च २००३ पर्यंत मृदसंधारण योजनेच्या कामासाठी मजूरांचे पगारासाठी किती बिले दिली, कोणत्या तारखेस दिली, सदर रकमांची पगारपत्रके, त्यांनी कार्यालयात हिशेब केव्हा सादर केले त्याची तारीख, गट रक्कम, कै. एम.जी. कदम यांच्या अपघाती निधनानंतर केलेल्या पंचनाम्याची प्रत, तिजोरीत मिळालेली रक्कम व कागदपत्रांच्या यादीची प्रत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गजानन कृष्णाजी जोशी यांनी तत्कालीन मंडल कृषि अधिकारी, जत (कै.) एम.जी.कदम यांनी दिलेल्या बिलाच्या अनुषंगाने व आपल्या सेवानिवृत्तीनंतर देय रकमा रोखल्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जत यांच्याकडे माहिती मागितली होती. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये श्री. जोशी यांनी अर्ज केले होते. हा कायदा निरसित झालेला असतानाही त्यावरील अपिले आयोगाने दाखल करून घेतली. दि. १९.३.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त त्यांचा समावेश केला होता, परंतु माहितीबाबत एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. जोशी यांची मुख्य मागणी सेवा निवृत्तीनंतर रोखून धरलेल्या रकमेची आहे. त्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांपासून ते सातत्याने पत्रव्यवहार करीत आहेत. श्री. जोशी यांना मजुरांचा पगार करण्यासाठी दि. ३०.३.२००३ रोजी दिलेल्या रू. १७,७५५/- या अग्रिमाचा हिशेब व संबंधित दस्तऐवज सादर न केल्यामुळे ऊर्वरित रक्कमा रोखून धरल्या आहेत. या बाबींची पूर्तता होताच नियमानुसार रक्कम देण्यात येईल, असे सन २००५ सालापासून सातत्याने श्री. जोशी यांना कळविले आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. बी. डी. लांडगे यांनी आयोगापुढील सुनावणीत

नमूद केले. श्री. एम.जी. कदम यांचे अपघाती निधन झाले व त्यानंतर पंचनामा करून त्यांचा पदभार देण्यात आला, या पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी गोपनीय म्हणून नाकारली व माहिती अपुरी दिली, असे श्री. जोशी यांनी प्रथम अपिलात म्हटले होते. पंचनाम्याची प्रत नाकारण्याचा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जत श्री. बी.बी. मास्तोळी यांनी योग्य ठरविला. मात्र विहित नमुन्यात उत्तर न देणे व अपुरी माहिती देणे याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी. डी. लांडगे यांना रू. ५००/- शास्ती लावली. माहिती देण्याचा आदेश देऊनही आपल्याला माहिती दिली गेली नाही व कमी शास्ती लावली, अशा कारणावरून श्री. जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

काही कागदपत्रात खाडाखोड असल्याच्या तक्रारी श्री. जोशी यांनी केल्या. श्री. जोशी यांना मूळ नस्ती दाखवून त्यानुसार छायांकित प्रती द्याव्यात, खाडाखोडीबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण द्यावे. तसेच पंचनाम्याची प्रत गोपनीय नसून ती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार पूर्तता केल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अशोक ईरण्पा मालगार यांनी दि. २१.५.२००८ रोजी आयोगाला कळविले. परंतु आपली दिशाभूल केली जात असल्याची तक्रार दि. ११.८.२००८ च्या पत्रान्वये श्री. जोशी यांनी आयोगाकडे केली. मात्र त्यातील मुद्दे 'माहिती' या सदरात समाविष्ट होणारे नाहीत. ठराविक प्रतीच हस्तलिखित का, जावक क्रमांक वाढत न जाता कमी कमी कसे होत गेले, अशा स्वरूपाचे मुद्दे त्यांच्या निवेदनात नमूद केले आहेत. माहितीच्या अचूकतेच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतचे स्पष्टीकरण श्री. जोशी यांना काही प्रमाणात दिल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. कोणतेही स्पष्टीकरण देण्यास व मूळ कागदपत्रे दाखविण्यास आपण तयार असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. आवश्यक वाटल्यास श्री. जोशी मूळ नस्तीचे अवलोकन करू शकतात. प्रथम अपिलात व आयोगाकडील अपिलात श्री. जोशी यांनी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मुद्दयांची माहिती मागितली आहे, हे योग्य नाही.

वेतनभत्ते, महागाईचा फरक इ. रोखून धरण्याच्या कारणाबाबत श्री. जोशी यांना माहिती देण्याचा आदेश आयोगाने दिला होता, ती माहिती त्यांना पूर्वीच देण्यात आली असूनही पुन्हा दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला दि. ११.८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. मात्र त्याबाबत श्री. जोशी यांनी

आक्षेप घेणारे मुद्दे उपस्थित केले आहेत. रकमा रोखून धरण्याचा अधिकार तालुका कृषि अधिकारी, जत यांना आहे की नाही, अशा स्वरूपाचे हे मुद्दे आहेत. ते 'माहिती' या सदरात येत नाहीत.

सेवा निवृत्तीनंतरची रक्कम रोखून धरण्याचा तपशील श्री. जोशी यांना वेळोवेळी देण्यात आला आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जत यांनी या संदर्भातील सविस्तर विश्लेषण दि. १५.३.२००८ च्या निवेदनाद्वारे आयोगाला सादर केले असून श्री. जोशी यांनाही वारंवार कळविले असल्याचे नमूद केले आहे. अग्रिमाचा हिशेब व अनुषंगिक कागदपत्रे सादर करणे / न करणे हा यातील मुख्य विषय आहे. रकमा रोखण्याचा निर्णय त्यावर आधारित आहे. हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

तार

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१३ .१०.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०१ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. आप्पासाहेब सहदेव कोळेकर<br>मु.पो.तुळशीदासनगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रभारी कार्यकारी संचालक,<br>श्री. संतनाथ सहकारी साखर कारखाना लि.,<br>तुळशीदास नगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक सह संचालक, साखर<br>पुणे विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब सहदेव कोळेकर यांनी श्री. संतनाथ सहकारी साखर कारखाना सुरू (दि.२८.१०.१९८०) झाल्यापासून कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नतीची माहिती, पदोन्नती न देण्याचे कारण, बढती दिलेल्या कर्मचाऱ्याचे व अपीलकर्ता यांच्या सेवेच्या कालखंडातील फरक, दि. २२.३.२००७ अखेर पदोन्नतीची संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत, इत्यादी बाबींविषयी माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी संचालक, श्री संतनाथ सहकारी साखर कारखाना लि., वैराग यांच्याकडे मागितली होती. मागणी प्रमाणे माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने वरील तीनही घटकांतील चर्चेअंती लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १२ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हिरालाल गेनबापू कदम
परिविक्षा अधिकारी, शासकीय भिक्षेकरी स्विकार केंद्र,
फुलेनगर, येरवडा, पुणे -६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त,
महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७१+५७२+५७३+५७४/पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.६.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.हिरालाल गेनबापू कदम
परिविक्षा अधिकारी, शासकीय भिक्षेकरी स्विकार केंद्र,
फुलेनगर, येरवडा, पुणे -६

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय,
पुणे श्री.जी.आर.शिंदे
**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे श्री.एम.डी.गायकवाड

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५७१ | ५.११.२००६ | ३.११.२००६ | | ३०.११.२००६ |
| ५७२ | ५.१०.२००६ | ६.१०.२००६ | | ३०.११.२००६ |
| ५७३ | ५.९.२००६ | ६.१०.२००६ | | ३०.११.००६ |
| ५७४ | ५.९.२००६ | -- | | ३०.११.२००६ |

४ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, पुणे व निरीक्षणगृह, बारामती यांचे संयुक्तिक लेखापरीक्षण अहवाल व इतर मुद्दे.

२. मागासवर्गीय कर्मचारी श्री.एच.जी.कदम यांचा १२ वर्षानंतरचा सुधारित वेतनश्रेणीचा फरक मिळण्याबाबतची माहिती.

३. विभागीय चौकशी ठराविक मुदतीत /कालमर्यादेत पूर्ण करावी याबातचा शासन आदेश व अनुषंगिक मुद्दे.

४. श्री.जी.के.सावंत यांची चौकशी अधिकारी म्हणून झालेली नेमणूक व त्यांना सादर केलेला चौकशी अहवाल याबाबतची माहिती.

## विवेचन

आपल्या पदोन्नतीच्या संदर्भात व आपल्याविरुध्दच्या चौकशीबाबत विविध मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.हिरालाल गेनबापू कदम यांनी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे व जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला बालविकास

अधिकारी, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे व मुख्यत: 'आपल्यावर अन्याय झाला असून दूर न केल्याच्या कारणावरुन' श्री.कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार अपिले केली आहेत.

श्री.कदम हे महिला व बालविकास विभागामध्ये परिविक्षा अधिकारी आहेत. 'आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांनी आपल्याला कालबध्द पदोन्नती / आश्वासित प्रगती अंतर्गत मंजूर केलेली होती. परंतु जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे यांनी वेतननिश्चिती करुन फरक अदा केलेला नाही. बीस वर्षांनंतर अनुज्ञेय असलेली पदोन्नती आपल्याला न देता आपल्यापेक्षा कनिष्ठ अधिकाऱ्याला दिली गेली. दि.३०.११.२००० रोजी आपल्याला आरोपपत्र देण्यात आले, परंतु सात वर्षे होऊनही विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आलेली नाही. शासकीय कर्मचाऱ्याची विभागीय चौकशी पाच वर्षांनंतर अवैध ठरते असे असूनही ती बेकायदेशीरपणे चालू ठेवण्यात आली आहे. श्री.अश्विनीकुमार अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त (प्रशासन) महिला व बालविकास, पुणे व जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे श्री.एम.डी.गायकवाड हे याला जबाबदार आहेत. शुल्क भरुन घेऊनही त्यांनी अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली, वाचता येणार नाहीत अशा हिशेब तपासणी अहवालाच्या प्रती दिल्या,' असे श्री.कदम यांनी लेखी निवेदनात विस्ताराने नमूद केले. श्री.कदम यांना संपूर्ण माहिती देण्यात आली असून काही बाबींची खुलासेवजा विचारणा त्यांनी केलेली असल्यामुळे व ती 'माहिती' या सदरात येत नसल्यामुळे देण्यात आलेली नाही असे श्री.एम.डी.गायकवाड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे, श्री.जी.आर.शिंदे, उपआयुक्त(प्रशासन), महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे व श्री.व.दि.मराठे, विद्यमान आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी लेखी निवेदनाद्वारे विस्ताराने नमूद केले.

दि.११.६.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

'श्री.कदम यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. तसेच त्यांची विभागीय चौकशी चालू असतानाही सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून त्यांना पदोन्नतीही देण्यात आली आहे, जिल्हा पररिविक्षा अधिकारी अमरावती येथे ते रुजू झाले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) श्री.जी.आर.शिंदे यांनी दि.११.६.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. मात्र अमरावती येथील आपली नियुक्ती ही पुण्यापासून दूर सूडबुध्दीने करण्यात आली आहे, असा आरोप श्री.कदम यांनी केला आहे.

श्री.कदम यांना देण्यात आलेल्या उत्तरामध्ये 'प्रश्नार्थक विचारणा असल्यामुळे माहिती देणे बंधनकारक नसल्याचे' काही मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारीयांनी म्हटले आहे. परंतु 'प्रश्नार्थक विचारणा' असल्याच्या कारणावरुन उत्तर नाकारण्याची कृती सरसकट करता येणार नाही. 'विभागीय चौकशीस प्रदीर्घ विलंब झालेला असताना श्री.कदम यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार पदोन्नती समितीने का केला नाही, त्याची कारणे काय,' अशासारख्या प्रश्नांबाबत हे उत्तर योग्य असले तरी 'विभागीय चौकशी ठराविक मुदतीत/कालमर्यादेत पूर्ण करावी असा शासनाचा नियम आहे काय, असल्यास त्याबाबतच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात, यासारख्या विचारणेबाबत हा निकष लावता येणार नाही. विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे की नाही, चौकशी अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला आहे की नाही, ही माहिती मिळणे हा संबंधित व्यक्तीचा हक्क आहे. मात्र आरोप, भाष्य याची दखल माहितीच्या अनुषंगाने घेता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता आपल्यावर अन्याय झाल्याची श्री.कदम यांची तक्रार असून तो दूर व्हावा, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. चौकशी कायदेशीर की बेकायदेशीर, पदोन्नती अन्य व्यक्तीला देणे योग्य की अयोग्य अशा स्वरुपाचे त्यांचे मुद्दे आहेत, ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाहीत.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत श्री.कदम यांच्या अर्जांना उत्तरे दिली आहेत. मात्र प्रश्नार्थक विचारणेबाबतचा अन्वयार्थ चुकीचा लावला असून त्यामुळे जी माहिती दिली गेलेली नाही, ती

देणे आवश्यक आहे. अन्वयार्थाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दक्षता घेणे गरजेचे आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) श्री.कदम यांच्याबद्दलची चौकशी पूर्ण झाली असल्यास त्याबाबतची माहिती, तसेच खुलासा, भाष्य, स्पष्टीकरण याची मागणी नसलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती श्री.कदम यांना दि.१५.११.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी व तसा अहवाल आयोगाला सादर करावा. अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महिला विकास, बालकल्याण यांची ही जबाबदारी राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.३१.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. लक्ष्मण भिमराव पांढरे<br>मु.पो. वाखरी, ता.पंढरपूर, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. लक्ष्मण भिमराव पांढरे यांनी मौजे वाखरी येथील किरकोळ केरोसीन परवानाधारक कै. भिमराव तुकाराम शिंदे हे मयत झाल्यानंतर त्यांचा वारस मुलगा रमेश शिंदे यांनी किती दिवस बेकायदेशीर परवाना चालविला, बेकायदेशीर परवाना चालविला नसल्यास तो त्यांच्या नावे कधी वर्ग केला, भिमराव शिंदे मयत झाल्यापासून ते मुलाच्या नावे वर्ग करतेवेळेस तो अधिकृत होता का, सदर दुकानदाराविरूध्द विभागीय उपआयुक्त (पुरवठा), पुणे विभाग, पुणे व तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी दुकानाच्या तक्रारीवर दिलेल्या आदेशान्वये काय कारवाई केली, सदर आदेशान्वये श्री. शिंदे यांचा केरोसीन पुरवठा बंद केला होता काय, बंद केला असल्यास त्याचा कालावधी व पुन्हा कोणाच्या आदेशान्वये सुरू केला, इत्यादी बाबींच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे मागितल्या होत्या.

अपीलकर्त्यास दि.२.९.२००६ रोजी गाव कामगार तलाठी यांच्यामार्फत माहिती देण्याचा प्रयत्न केला. परंतु अपीलकर्त्याने माहिती न स्वीकारल्याने दि. २९.११.२००६ रोजी 'टपालाचा दाखला घेऊन' माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. परंतु दि. २.९.२००६ व दि. २९.११.२००६ ची पत्रे मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. पंधरा

दिवसांत माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' ठरले होते. परंतु सदर माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. १९.७.२००८ च्या पत्राने आयोगास कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. चर्चेतील निर्णयानुसार अपीलकर्त्यास माहिती पाठविल्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांच्यामार्फत त्यांच्या अभिप्रायासह आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १२ .९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५९३ / सांगली | श्री. प्रशांत उध्दव कुलकर्णी मु.पो. सावळज, ता.तासगाव जि. सांगली | तालुका कृषि अधिकारी, तासगांव, जि. सांगली | जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, तासगांव, जि.सांगली | मागील सहा महिन्यात शेतकऱ्यांना आलेले सर्व प्रकारचे अनुदान, त्याचे वाटप कसे करण्यात आले इ. बाबत एकूण चार मुद्दयांची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याने आपणास सर्व माहिती मिळाल्याचे दि.१०.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | ६१५ / सांगली | श्री. राजेंद्र नामदेव साबळे रा.वर्षा निवास, साठेनगर, आटपाडी, जि.सांगली | अधिक्षिका, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, गुरुवार पेठ, तासगाव, जि. सांगली | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गुलमोहर बिल्डिंग, माळी थिएटर चौक, सांगली | सदर वसतीगृहाच्या स्थापनेबाबतच्या शासन निर्णयाची प्रत | माहिती देण्यात आली आहे. |
| ३ | ४६५ / सांगली | श्री. राजेंद्र नामदेव साबळे | विशेष समाज कल्याण अधिकारी, सांगली, जि.सांगली | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पीएमटी बिल्डिंग, १ ला मजला, स्वारगेट, पुणे-३७ | दि. १.४.२००५ ते दि. ३१.३.२००७ या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या माहिती साठी केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती | माहिती देण्यात आली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५२८ / सांगली | श्री. शिवाजी आनंदा कापसे मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जि. सांगली | सहाय्यक वनसरंक्षक, वन्यजीव, १६९१ गंजी गल्ली, बिंदू चौक, कोल्हापूर | वनसरंक्षक, वन्यजीव, १६९१ गंजी गल्ली, बिंदू चौक, कोल्हापूर | कार्यालयातील कर्मचारी /अधिकारी यांच्याबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ४९१ / सांगली | श्री. संभाजीराव गोविंदराव ओलेकर मु.पो.कवठे महांकाळ, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | तालुका कृषि अधिकारी, कवठे महांकाळ, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | उपविभागीय कृषि अधिकारी, जत, ता. जत, जि. सांगली | नाला बंडिंग, सिमेंट बंधारे, सी.सी.टी. त्यातील पाणी साठा याबाबतची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ५९१ / सांगली | डॉ. ग.न. हरपनहळ्ळी केशवस्मृती, विटा डेअरी समोर, ब्राह्मणपुरी, मिरज, जि. सांगली | अप्पर कोषागार अधिकारी (सं), कोल्हापूर | कोषागार अधिकारी (सं), कोल्हापूर | सन १९९७-९८ ते २०००-२००१ या कालावधीतील अंडी उबवणी केंद्र, कोल्हापूर येथील शासकीय जमा रकमेबाबत | अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३१.१०.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**